# प्रकरण - ४ सार्वजनिक क्षेत्रातील बँकव्यवसाय

## प्रास्ताविक -:

भारतीय बँकप्रणालीमध्ये सार्वजनिक क्षेत्रातील बँकांना अतिशय महत्वाचे स्थान आहे. देशातील बँकव्यवसायात सार्वजनिक बँकांचा वाटा सर्वात जास्त आहे. सार्वजनिक क्षेत्रातील बँका या सरकारच्या मालकीच्या व त्यांच्यावर सरकारचे नियंत्रण असते.

### सार्वजनिक क्षेत्रातील बँका - व्याख्या

" ज्या बँकांची मालकी, व्यवस्थापन, नियमन आणि नियंत्रण सरकारकडून केले जाते त्या बँकांना **सार्वजनिक क्षेत्रातील बँका** असे म्हणतात".

" ज्या बँकांचे भागभांडवल पन्नास टक्क्यांपेक्षा जास्त सरकारने धारण केलेले असते व सरकारची मालकी असते ; अशा बँकांना **सार्वजनिक क्षेत्रातील बँका** असे म्हणतात".

## सार्वजनिक क्षेत्रातील बँकांची वैशिष्टे

१) स्थापना

२) मालकी

३) व्यवस्थापन

४) उद्देश

५) भागभांडवल

६) वर्गीकरण

७) अनुसूचित बँकांचा दर्जा

८) सामाजिक बँकिंग

९) शाखाविस्तार

१०) लोकांचा विश्वास

११) व्याजदर

१२) मोठ्या प्रमाणावर कर्जपुरवठा

## सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे वर्गीकरण

सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे सामान्यपणे पुढील प्रकारे वर्गीकरण केले जाते .

**भारतीय रिझर्व्ह बँक**

**सार्वजनिक क्षेत्रातील बँका**

**स्टेट बँक ऑफ इंडिया** **इतर राष्ट्रीयीकृत बँका** **प्रादेशिक ग्रामीण बँका**

## भारतीय रिझर्व्ह बँक

१ एप्रिल १९३५ रोजी रिझर्व्ह बँक कायदा १९३४ अनुसार भारताची मध्यवर्ती बँक म्हणून रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाची स्थापना करण्यात आली. सुरवातीला हि बँक खाजगी भागधारकांच्या मालकीची होती.

१ जानेवारी १९४९ रोजी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले ; त्यामुळे या बँकेची मालकी भारत सरकारकडे आली. चालननिर्मिती करणे आणि चलन व्यवस्थापन करणे हे रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे सर्वात महत्वाचे कार्ये आहे

## १) स्टेट बँक ऑफ इंडिया व स्टेट बँक संलग्न बँका

## २) इतर राष्ट्रीयीकृत बँका

## ३) प्रादेशिक ग्रामीण बँका

## स्टेट बँक ऑफ इंडिया : उत्क्रांती ,कार्ये व कामगिरी

स्टेट बँक हि भारतातील सर्वात मोठी एक प्रमुख व्यापारी बँक आहे . स्टेट बँकेची स्थापना १ जुलै १९५५ रोजी झालेली असली तरी भारतात स्टेट बँकेच्या स्थापनेचा इतिहास फार जुना आहे.

## स्टेट बँक ऑफ इंडियाची कार्ये

१) रिझर्व्ह बँकेचा प्रतिनिधी म्हणून कार्य करणे

२) ठेवी स्वीकारणे

३) कर्जपुरवठा करणे

४) मध्यस्थ म्हणून कार्य करणे

५) औद्योगिक विकासाला चालना देणे

६) परकीय विनिमय व्यवसाय

७) कृषी व ग्रामीण विकास

८) आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना वित्तसहाय्य उपलब्ध करून देणे

९) सहकारी क्षेत्राच्या विकासाबाबत कार्ये

१०) वित्तीय सेवा पुरविणे

११) ग्राहकांना सेवा पुरविणे

१२) भांडवल उभारणीला चालना देणे

## स्टेट बँक ऑफ इंडियाची कामगिरी

१) शाखाविस्तार

२) ए. टी. म.

३) ठेवी

४) कर्जपुरवठा

५) नफा

६) निष्क्रिय मालमत्ता

## राष्ट्रीयीकृत बँका :

**व्याख्या** - " स्वातंत्र्योत्तर काळात खाजगी क्षेत्रातील ज्या व्यापारी बँकांचे सरकारने राष्ट्रीयीकरण केले त्या बँकांना राट्रीयीकृत बँका असे संबोधले जाते".

१ जानेवारी १९४९ रोजी रिझर्व्ह बँकेचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले

१ जुलै १९५५ रोजी स्टेट बँक ऑफ इंडियाचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले

सन १९५९ मध्ये स्टेट बँक ऑफ इंडियाच्या आठ संलग्न बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. १९ जुलै १९६९ रोजी ५० कोटींपेक्षा जास्त ठेवी असणाऱ्या खाजगी क्षेत्रातील चौदा प्रमुख व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. १५ एप्रिल १९८० रोजी २०० कोटींपेक्षा जास्त ठेवी असणाऱ्या खाजगी क्षेत्रातील सहा बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले.

### व्यापारी बँकांवरील सामाजिक नियंत्रण

### सामाजिक नियंत्रण - व्याख्या

" विशिष्ट्य व्यापारी बँकांची मालकी खाजगी भागधारकांकडे राहील. देशाच्या सामाजिक आणि आर्थिक उद्दिष्ठाच्या पूर्ततेसाठी या बँकांवर सरकारचे नियंत्रण ठेवण्याच्या पद्धतीला व्यापारी बँकांवरील सामाजिक नियंत्रण असे म्हणतात".

**आवश्यकता : -**

भारतात खाजगी क्षेत्रातील बँक श्रीमंताना व उद्योजक व्यावसायिकांना कर्ज देत होत्या. तर गरीब दुर्बल घटकांना कर्ज देत नव्हत्या . ग्रामीण भागात शाखाविस्तार करत नव्हत्या प्राधान्य क्षेत्रालाही कर्ज देत नव्हत्या. बँक सुविधांपासून वंचित होते. हि परिस्थती विचारात घेऊन सामाजिक नियंत्रणाचा कायदा करण्यात आला.

**उद्दिष्ट्ये : -**

बँकांवरील सामाजिक नियंत्रण पुढील उद्दिष्ट्ये समोर ठेऊन करण्यात आले आहे.

१) देशातील बँकव्यवसायाची निकोप प्रगती करणे

२) ग्रामीण व अर्धनगरी भागात बँकिंग सोईसुविधांमध्ये वाढ करणे

३) पतपैशाचा गैरवापर नियंत्रण ठेवणे

४) देशातील जनतेचा बँकांवरील विश्वास दृढ करणे

५) आर्थिक विकासाच्या गरजा आणि पत्रव्यवहार या दोघांत समन्वय साधने

६) प्राधान्य क्षेत्राला पुरेशा प्रमाणात कर्जपुरवठा करणे

**व्यापारी बँकांवरील सामाजिक नियंत्रणाचे स्वरूप व कार्यवाही**

१) अध्यक्षाची नियुक्ती

२) अध्यक्षांची बडतर्फी

३) संचालक मंडळ रचना

४) कर्जावरील निर्बध

५) रिझर्व्ह बँकेला व्यापक अधिकार

६) प्राधान्य क्षेत्राला कर्ज

७) परकीय बँक

८) कर्मचाऱ्यांवरील निर्बंध

९) राष्ट्रीयीकरण

## राष्ट्रीयीकरणाच्या बाजूने व विरुद्ध युक्तिवाद

## राष्ट्रीयीकरणाच्या बाजूने युक्तिवाद

१) मोक्याची क्षेत्रे  ताब्यात घेणे

२) बचतीत  वाढ करणे

३) राष्ट्रहित किंवा समाजहित साध्य करणे

४) बँक विकासातील प्रादेशिक असमतोल दूर करणे

५) सर्वसामान्यसाठी बँका

६) उत्पन्न आणि संपत्तीचे केंद्रीकरण कमी करणे

७) कर्जाचा गैरवापर टाळणे

८) चलनविषयक व प पतविषयक धोरण यात समन्वय साधने

९) कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमतेत वाढ करणे

१०) व्यवस्थापनात सुधारणा करणे

## राष्ट्रीयीकरणाच्या विरुद्ध युक्तिवाद

१) व्यापारी बँकांवरील सामाजिक नियंत्रण कायदयाचा यशापयशाचा विचार

२) राजकीय निर्णय

३) सार्वजनिक क्षेत्राचे दोष

४) स्पर्धेचा अभाव

५) निर्णय घेण्यावर परिणाम

६) अकार्यक्षमता

७) लाभप्रदतेत घट

८) सरकारचे वर्चस्व वाढेल

९) थकबाकी

१०) कर्मचाऱ्यांचे वर्चस्व वाढेल

प्रादेशिक ग्रामीण बँका : उद्दिष्ट्ये ,कार्ये, भांडवल , प्रादेशिक ग्रामीण बँकांपुढील आव्हाने

सन १९७५  मध्ये ग्रामीण भागातील जनतेची सावकारी पाशातून सुटका करण्यासाठी व ग्रामीण भागातील घटकांना अल्प व्याजदराने कर्जपुरवठा उपलब्ध करून देण्यासाठी २६ सप्टेंबर १९७५ रोजी प्रादेशिक ग्रामीण बँका कायदा झाला.

२ ऑक्टोबर १९७५ रोजी राजस्थान राज्यात ५ प्रादेशिक ग्रामीण बँका स्थापन करण्यात आल्या.

**प्रादेशिक  ग्रामीण बँका व्याख्या**

" प्रादेशिक ग्रामीण बँक कायदा, १९७६ कलम ३ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या बँकांना **प्रादेशिक ग्रामीण बँक** असे म्हणतात ".

" ग्रामीण भागातील लहान शेतकरी , शेतमजूर , कारागीर , यांना पतपुरवठा व इतर सोयीसुविधा देण्याच्या उद्देशाने प्रादेशिक ग्रामीण बँक कायदा ,१९७६ अन्वये स्थापन केलेल्या बँकांना **प्रादेशिक ग्रामीण बँका** असे म्हणतात".

**प्रादेशिक ग्रामीण बँका स्थापन करण्यामागील करणे**

१) ग्रामीण पतपुरवठ्यातील पोकळी भरून काढणे

२) ग्रामीण जनतेची सावकारी पाशातून मुक्तता करणे

३) ग्रामीण विकासाला चालना देणे

४) समाजातील दुर्बल घटकांना कर्जपुरवठा करणे

५) ग्रामीण बचतीला चालना मिळणे

६) मागास भागात बँक सुविधांचा विकास करणे

७) ग्रामीण जनतेला व्यापारी आणि सहकारी बँकांचा दुहेरी लाभ एकत्र मिळवून देणे

८) सहकारी पतपुरवठ्याचे  दोष कमी करणे

**प्रादेशिक ग्रामीण बँकांची उद्दिष्टे**

१) ग्रामीण भागातील जनतेची सावकारी पाशातून मुक्तता करणे ; ग्रामीण भागात  सावकारांना पर्यायी व्यवस्था निर्माण करणे.

२) ग्रामीण भागाच्या आर्थिक विकासाला चालना देणे ग्रामीण भागातील शेती उद्योग ,व्यापार व वाणिज्य क्षेत्राच्या विकासासाठी पतपुरवठा उपलब्ध करून देणे .

३) ग्रामीण भागातील जनतेला बचतीस प्रोत्साहन देणे  जनतेकडून ठेवीच्या रूपाने गोळा केलेला  पैसा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा उत्पादक कार्यासाठी कर्जाऊ देणे.

४) ग्रामीण व दुर्बल भागात शाखाविस्तार करणे .

५) ग्रामीण भागात उद्योजकता विकास प्रोत्साहन देणे .

६) शेती व शेतीशी निगडित व्यवसाय यांच्या विकासासाठी वित्तपुरवठा करणाऱ्या सहकारी संस्था ,सहकारी प्रक्रिया संस्था सेवा सहकारी संस्थांना पतपुरवठा करणे .

७) ग्रामीण  भागात उद्योगासाठी वित्तपुरठा करून रोजगाराच्या विविध संधी निर्माण करणे.

**प्रादेशिक ग्रामीण बँकांची कार्ये**

१) ग्रामीण अर्थव्यवस्थेतील विशिष्ट क्षेत्र व विशिष्ट घटकांना कर्जपुरवठा करणे .

२) ग्रामीण औद्योगिकिकरणास  चालना देणे .

३) ठेवी गोळा करणे .

४) दुर्बल घटकांना कर्जपुरवठा करणे .

५) बँक विकासातील प्रादेशिक असमतोल  कमी करणे .

६) ग्रामीण भागात बँक सुविधा पुरविणे.

७) ग्रामीण बचतीला चालना देणे .

८) रोजगार संधीत वाढ करणे .

९) ग्रामीण  भागात बँकिंगचा प्रसार करणे .

१०) पतपुरवठा उभारणीचा खर्च कमी करणे.

**प्रादेशिक ग्रामीण बँकांसमोरील समस्या**

१) संघटनात्मक समस्या

२)  असमान विकास

३) कर्ज वसुलीदर कमी

४) प्रचंड वाढत जाणारे तोटे

५) व्यवस्थापकीय समस्या

६) सदोष कर्जधोरण

७) अनावश्यक शाखाविस्तार

८) अपुरे भांडवल

९) गुंतवणुकीला मर्यादित व्याप्ती

१०) अनिष्ट स्पर्धा

११) ठेवी गोळा करण्यात अडथळे

१२) प्रशिक्षणाचा अभाव

१३) सहकार्याचा अभाव

## भारतातील सार्वजनिक बँकांसमोरील आव्हाने

भारतात सन १९९१ नंतर खाजगीकरण , उदारीकरण व जागतिकीकरण धोरण स्वीकारल्यामुळे त्याचा परिणाम बँकव्यवसायावर झालेला आहे. सार्वजनिक क्षेत्रातील बँकांवर सरकारची मालकी असल्यामुळे सरकारच्या नियमानुसार कार्ये करत असतांना सार्वजनिक बँकांसमोर अनेक आव्हाने आहेत .

१) मोठ्या प्रमाणात थकबाकी .

२) असमान शाखाविस्तार .

३) सवलतीच्या दरात कर्जे .

४) निष्क्रिय मालमत्तेचे वाढते प्रमाण.

५) राजकीय दबाव .

६) स्पर्धेचे आव्हान .

७) गैरव्यवहाराच्या समस्येचे आव्हान .

८) सायबर सुरक्षिततेचे आव्हान .

९) तंत्रज्ञानातील बदल .

१०) भांडवल पर्याप्तता प्रमाण.

## अग्रणी बँक योजना

भारतात डिसेंबर १९६९ मध्ये अग्रणी बँक योजना सुरु करण्यात आली .

**व्याख्या**

- " जिल्ह्यांमध्ये बँकिंग सुविधा वाढविण्यासाठी नेतृत्व करण्याची जबाबदारी ज्या बँकेवर सोपविण्यात आली त्या बँकेला **अग्रणी बँक** असे म्हणतात ".

प्रत्येक जिल्ह्यामध्ये एक अग्रणी बँक नेमण्यात आली ; या अग्रणी बँकेने जिल्ह्यातील इतर राष्ट्रीयीकृत बँका , सहकारी बँका व शासकीय संस्था यांच्या सहकार्याने जिल्ह्यावर बँकिंग सुविधांचा विकास करण्याची जबाबदारी पार पाडावयाची आहे.

## अग्रणी बँक योजनेची उद्दिष्टे

१) ग्रामीण भागातील बँक सुविधांमध्ये वाढ करणे

२) ग्रामीण भागात ठेवी गोळा करण्यास प्रोत्साहन देणे

३) कर्जाची मागणी व कर्जाचा पुरवठा यातील अंतर कमी करण्यासाठी नियोजन करणे

४) जिल्ह्यातील वेगवेगळ्या बँकांकडून होणारा कर्जपुरवठा यात समन्वय प्रस्थापित करणे .

५) शेती व लघुउद्योग या प्राधान्य क्षेत्रातील घटकांना जास्तीत जास्त कर्जपुरवठा करण्यासाठी जिल्हा स्तरावर इतर बँकांना मार्गदर्शन करणे .

## अग्रणी बँक योजनेची कार्यवाही

१) जिल्हा वाटप

२) जिल्हा सल्लागार समिती

३) जिल्हा पतनियोजन

४) पतयोजनेचे पुनरावलोकन

## अग्रणी बँक योजनेचे फायदे

१) अग्रणी बँक योजनेमुळे भारतातील सर्व जिल्हातील ग्रामीण भागात झपाट्याने

शाखाविस्तार झाला.

२)अग्रणी बँक योजनेमुळे जिल्ह्यातील सर्व क्षेत्रांना पुरेशा प्रमाणात कर्जपुरवठा झाला .

३) अग्रणी बँक  योजनेमुळे जिल्ह्यातील प्रगत भागात व मागास भागातील बँक विकासातील प्रादेशिक असमतोल दूर झाला.

४)  अग्रणी बँक योजनेमुळे जिल्ह्यातील शासकीय संस्था , व्यापारी आणि सहकारी बँका यांच्यामध्ये समन्वय प्रस्थापित झाला.

५) अग्रणी बँक योजनेमुळे जिल्ह्याचा विकास करत असतांना येणाऱ्या अडचणी दूर झाल्या .

**अग्रणी बँक योजनेचे तोटे / दोष**

१) अवास्तवं  पतयोजना

२) पायाभूत सुविधांचा अभाव

३) कर्मचारी प्रशिक्षणाचा अभाव

४) इतर बँक सहकार्याचा अभाव

५) समन्वयाचा अभाव